### डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला आणि तोरणे संशोधन व विकास संस्था इंदोर यांच्यामध्ये

## कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित प्रकल्प राबविण्यासाठी सामंजस्य करार

**अकोला :** नुकतेच राज्य शासनाने शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यासाठी धोरण जाहीर केले आहे. यामध्ये कृषी विद्यापीठांनी स्वतः किंवा इतर खाजगी संस्था, स्टार्ट अप आणि इतर संशोधन संस्था यांच्या समवेत विविध विषयाशी संबंधित कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून तंत्रज्ञान विकसित करण्याचे अपेक्षित आहे ज्याद्वारे कीड व्यवस्थापन, तन व्यवस्थापन, अन्नद्रव्य व्यवस्थापन, पशुधन व्यवस्थापन आणि इतरही बाबतीमध्ये काटेकोर पद्धतीचा अंगिकार करून शेतकरीभीमुख तंत्रज्ञान विकसित करता येईल. यासाठी पुढाकार घेऊन डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला यांनी इंदोर स्थित तोरणे संशोधन व विकास संस्था यांच्या समवेत विविध विषयांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून प्रकल्प राबविण्यासाठी समंजस्य करार केला. यावेळी विद्यापीठाचे सन्माननीय कुलगुरू डॉ. शरद गडाख, संचालक संशोधन डॉ. विलास खर्चे , संचालक विस्तार शिक्षण डॉ. धनराज उंदीरवाडे, अधिष्ठाता कृषी डॉ. श्यामसुंदर माने अधिष्ठाता कृषी अभियांत्रिकी डॉ. सुरेंद्र काळबांडे कुलसचिव डॉ. सतीश ठाकरे , कृषी विद्या विभागाच्या प्रमुख डॉ.अनिता चोरे, पशुसंवर्धन विभागाचे प्रमुख डॉ. शेषराव चव्हाण, तोरणे संशोधन विकास संस्थेच्या प्रमुख डॉ. स्नेहल तोरणे, श्री संकेत हुद्देदार, विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. किशोर बिडवे तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कार्यक्रमाचे सम न्वयक डॉ. नितीन कोंडे व पशुसंवर्धन विभागाचे डॉ. संजय शेगोकार उपस्थित होते.

### -चला घडवूया विकसित महाराष्ट्र!-

## विकसित महाराष्ट्राचे 'व्हिजन डॉक्युमेंट' निर्माण करण्यासाठी योगदान द्यावे : जिल्हाधिकारी

**▪अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :** 'विकसित महाराष्ट्र २०४७' अंतर्गत राज्याच्या विकासाबाबत नागरिकांच्या प्रतिक्रिया व सहभाग मिळिवण्यासाठी सर्वे क्षण करण्यात येत आहे. अकोला जिल्ह्यातील नागरिकांनी त्यात सहभाग घेऊन 'विकसित महाराष्ट्र २०४७ : महाराष्ट्राचे व्हिजन डॉक्युमेंट' निर्माण होण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी केले आहे.विकसित महाराष्ट्राची रुपरेषा ठरविण्यासाठी



राज्यभर सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. सामान्य नागरिकांचा सहभाग त्यात महत्वाचा आहे. ग्रामसेवक, आशा कार्यकर्ता,

- 'विकसित महाराष्ट्र २०४७ : महाराष्ट्राचे व्हिजन डॉक्युमेंट';
- गावोगाव सर्वेक्षण; नागरिकांच्या प्रतिक्रिया जाणून घेणार

अंगणवाडी सेविका, विविध माध्यमे यांच्या माध्यमातून गावोगाव याबाबत जनजागृती होत आहे.

**'विकसित महाराष्ट्र २०४७ :** महाराष्ट्राचे व्हिजन डॉक्युमेंट'मध्ये नागरिकांच्या आशा-आकांक्षांचे प्रतिबिंब असेल. त्यासाठी नागरिकांच्या समस्या, शासनाकडून असलेल्या अपेक्षा त्यांच्याकडून जाणून घेण्यात येणार आहेत. गावोगाव हे सर्वे क्षण होणार आहे.

अकोला जिल्ह्यातील नागरिकांनी या महत्वपूर्ण सर्वे क्षणात माहिती, प्रतिक्रिया नोंदवून परिपूर्ण व्हिजन डॉक्युमेंट निर्माण होण्यात आपले योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. कुंभार यांनी केले.

## पंढरीच्या वारकऱ्यांना पथकरातून सवलत

**▪अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :** श्री क्षेत्र पंढरपूर येथे आषाढी वारीसाठी जाणा-या पालख्या, वारकरी यांना पथकरातून सवलत देण्यात आली आहे.ही सवलत दि. १० जुलैपर्यंत पालखी, वारक-यांच्या हलक्या व जड वाहनांसाठी असेल. त्यासाठी पास देण्यात येत आहेत. ते परतीच्या प्रवासातही ग्राह्य असतील. असा पास मिळवू इच्छिणा-या व्यक्तींनी प्रादेशिक परिवहन कार्यालयात अर्ज करावा.

वाहन क्रमांक, मालकाचे नाव, भ्रमणध्वनी, प्रवासाच्या तारखा आदी माहिती, तसेच आधारपत्राची स्वसाक्षांकित प्रत जोडावी. अकोला जिल्ह्यातून आषाढी वारीसाठी पंढरपूरला जाणा-या भाविक, पालख्या व वारकरी यांनी पथकर सवलतीचा लाभ घेण्याचे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी केले आहे.

### गरजूंना उपचार व मदतीसाठी

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी

**▪अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :** मुख्यमंत्री सहायता निधीतून गरजूंना वैद्यकीय मदतीसाठी ३० लक्ष ३० हजार रू. रकमेचे ३७ प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून व रामेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनात प्रत्येक जिल्ह्यात मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष स्थापन करण्यात आला आहे. अकोला येथे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नूतन इमारतीत पहिल्या मजल्यावर हे कार्यालय सुरू आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री आकाश फुंडकर यांच्या हस्ते या कार्यालयाचा शुभारंभ झाला. जिल्हाधिकारी अजित कुंभार, निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील यांच्या मार्गदर्शनात कक्षातर्फे गुणवत्तापूर्ण कार्यवाही होत आहे. धर्मादाय आयुक्त कार्यालयाअंतर्गत मुख्यमंत्री सहायता



निधीसाठी रक्तपेढीसह प्रमाणित रूग्णालये १२ आहेत. इतर प्रमाणित रूग्णालयांची संख्या ४४ आहे. जिल्ह्यात वैद्यकीय मदतीचे ३७ प्रस्ताव मंजूर करण्यात आले असून, ६७ प्रस्तावांवर कार्यवाही होत आहे.कक्षातर्फे रक्तदान शिबिरांद्वारे रक्तपिशव्यांचे संकलन, आपत्ती व्यवस्थापनासाठी मॉक ड्रिल, लाभार्थ्यांमध्ये वृक्षारोपणाबाबत प्रबोधन असे अनेक उपक्रम राबविण्यात येत आहेत, अशी माहिती डॉ. विशाल येदवर यांनी दिली.

## बाभुळगाव ते सस्ती रस्त्याची दुरवस्था

### शेतकऱ्यांचे नुकसान,दुरुस्तीची मागणी

**▪पातुर,दि २७ (प्रतिनिधी) :** पातूर तालुक्यातील बाभुळगाव ते सस्ती या मार्गाची दुरवस्था शेतकऱ्यांसाठी मोठ्या अडचणीचे कारण बनली आहे. या रस्त्याचा उपयोग अनेक शेतकरी शेतीसाठी दररोज करतात. मात्र, सध्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल साचल्याने वाहतुकीचा पूर्णतः बोजवारा उडालेला आहे. विशेषतः शेतकरी सुरेश प्रल्हाद महानकर यांच्या शेतीसाठी हा रस्ता अत्यावश्यक असून त्यांना रोज शेतीच्या कामासाठी सकाळ-संध्याकाळ शेतात जावे लागते.

सुरेश महानकर यांनी यंदा भाजीपाला लागवड केली आहे. मात्र रस्त्याची परिस्थिती इतकी वाईट झाली आहे की, शेतात पायी जाणेसुद्धा कठीण झाले आहे. बैलगाडी, ट्रॅक्टर यासारख्या साधनांनी शेतीमध्ये पोहोचणे अशक्य झाले आहे. परिणामी, मशागत, पेरणी, निंदणी यासारखी महत्त्वाची शेतीकामे पूर्णतः ठप्प झाली असून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे, बाभुळगाव-सस्ती रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत सन २०१७-१८ दरम्यान करण्यात आले होते. मात्र



या रस्त्यातील अंदाजे दीड किलोमीटरचा भाग पूर्ण करण्यात आलेला नाही. हाच अपूर्ण रस्ता आज शेतकऱ्यांच्या त्रासाचे मूळ कारण ठरत आहे.

शेतकरी सुरेश प्रल्हाद महानकर यांनी इतर शेतकऱ्यांसह २७ जून रोजी पातूर येथील तहसीलदार यांच्याकडे निवेदन सादर करून रस्त्याच्या तात्काळ दुरुस्तीची मागणी केली. निवेदनात रस्त्याच्या दुरवस्थेमुळे होणारे शेतीतील अडथळे आणि होणारे नुकसान स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे ठोस उपाययोजनांची मागणी केली असून लवकरात लवकर हा रस्ता दुरुस्त करण्यात यावा, अन्यथा आंदोलनाचा इशाराही दिला आहे.

## अज्ञात वाहनाच्या धक्क्यात एकाचा मृत्यू

**▪अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :** बाळापुर पोलीस स्टेशन हद्दीत अकोला नाका परिसरात अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत एकाचा मृत्यू झाल्याची घटना सकाळी उघडकीस आली आहे.

अकोला नाका परिसरात असलेल्या गजानन महाराज मंदिराजवळ रस्त्यावर एक युवक पडून असल्याची माहिती मिळाल्यावर बाळापूर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली असता सदर व्यक्तीचा मृत्यू झाला असल्याचे निष्पन्न झाले सदर मृत्यू पावलेल्या व्यक्तीचे नाव विजयकुमार भालेराव असे असून तो वाशिम जिल्ह्यातील मनोरा परिसरातील रहिवासी असल्याचे समोर आले.

### मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.लहाने यांच्याव्दारे

## अतिक्रमीत किरकोळ फळ विक्रेताच्या गाडीची तपासणी

**▪अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :** अकोला महानगरपालिका क्षेत्रातील पुर्व झोन अंतर्गत येणा-या जनता भाजी बाजाराच्या प्रवेशव्दारा समोर अतिक्रमतीत फळ विक्रीची चार चाकी गाडीची अकस्मात तपासणी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनलि लहाने यांनी केली असता त्यांच्याकडे प्रतिबंधीत कॅरीबॅगचे चार पाकीट आढळून आल्याने त्यांचे कडील साठा जप्त करून अतिक्रमण विभागाव्दारे सदर अतिक्रमीत चारचाकी गाडी क्रश करून जप्त करण्यात आली आहे. याचसोबत पुर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिण झोन अंतर्गत असलेल्या मुख्य बाजारपेठेतील १५ व्यावसायिक व किरकोळ व्यावसायिकांकडून प्रतिबंधीत कॅरीबॅग व प्रतिबंधीत प्लास्टीक कोटेड वस्तुंचा साठा आढळल्याने साठा जप्त करून एकुण २४५००/- रूपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. यापुढे शहरातील फळ व भाजी विक्रेत्यांकडे कॅरीबॅग साठा आढळून आल्यास त्यांचे संपुर्ण साहित्य जप्त करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे



याची संबंधीत व्यावसायिकांनी नोंद घ्यावी.

अकोला महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी तसेच सर्व प्रकारच्या व्यावसायिकांनी शासनाने बंदी घातलेल्या एकल यूज प्लास्टीक व थर्माकॉल अविघटनशील वस्तू, कॅरीबॅग आणि प्रतिबंधीत प्लास्टीक कोटींग असलेले डिस्पोजेबल डिश, कप, प्लेट्स, ग्लासेस, काटा, वाडगा, कंटेनर वापर, विक्री, साठा, उत्पादन व वितरण संपुर्णपणे बंद करून अकोला महानगरपालिका प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांनी यावेळी केले आहे. यावेळी स्वच्छता विभाग प्रमुख संजय खोसे, सहा.अतिक्रमण अधिकारी प्रवीण मिश्रा, वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक शैलेश पवार यांचेसह अतिक्रमण विभागातील कर्मचा-यांचा समावेश होता.

## थोडक्यात

### शहरात पाणीच पाणी !

**अकोला :** यंदा मृग नक्षत्र जवळपास कोरडे गेले असलेतरीगत दोन दिवसांपासून महानगरात पावसाने हजेरी लावली असून शहरात सर्वदूर पाणीच पाणी साचले आहे. कॅलटॅक्स चौक, दुर्गा चौक, साने गुरुजी वाचनालयासमोर पाणीच पाणी पाणी साचल्याने वाहनधारकांना वाहने काढणे कठीण झाले होते. दरम्यान, गुरूवारी सकाळपासूनच पावसाची रिपरिप पावसाचा जोर वाढला. दुपारी १ ते ३ या वेळेत जोरदार पाऊस झाला.सुरू होती.

### विवेकानंद शाळेत विद्यार्थ्यांना वृक्ष वाटप

**अकोला:** स्थानिक तापडिया नगरस्थित विवेकानंद इंग्लिश हायस्कूल आणि शुभंकरोती फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने
शाळेतील ढीशश लींववू लश्रींल तर्फे आयोजित वृक्ष वाटपाचा कार्यक्रम शाळेत संपन्न झाला. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका मा. सौ. संगिता कोकीळ, माध्यमिक शाळेच्या पर्यवेक्षिका सौ. मिनल कापशे प्राथमिक शाळेच्या सौ. नयना हातवळणे, ट्री बडींग क्लबचे अध्यक्ष डॉ. संतोष सोमानी, सचिन डॉ. प्रदीप अग्रवाल, डॉ. आशुतोष डाबरे, डॉ. निलेश कोरडे, डॉ. महेंद्र चांडक, डॉ. अनिता सोमानी तसेच डॉ. सदानंद भुसारी यांच्याहस्ते वर्ग ४ थी व ५ वी च्या विद्यार्थ्यांना 'रोप वाटप करण्यात आले. वाढत्या प्रदूषणाला योग्य वेळी आळा घालण्यासाठी व पर्यावरणाच्या हितासाठी वृक्ष लागवड करणे कसे महत्त्वाचे आहे, याबाबत शाळेचे सहशिक्षक आनंद थत्ते यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

### बाळापूर ते हाता बसफेरीची प्रतीक्षा

हाताः अकोला आगार क्र. २ मधून धावणारी बाळापूर ते हाता बसफेरी कोरोना काळापासून बंद झालेली आहे. ही बस फेरी सुरु करण्यात यावी याबाबत गावकऱ्यांकडून व जिजामाता विद्यालयामार्फत अनेक वेळा निवेदन सादर केले. परंतु संबंधित वाहतुक सहाय्यक अधिकारी यांच्याकडून केवळ उडवाउडवीची उत्तरे मिळाले. त्यामुळे ही बस फेरी बंद असून केंव्हा सुरू करण्यात येईल, अशी प्रतीक्षा केल्या जात आहे. सध्या कॉलेज व उच्च माध्यमिक शाळा सुरु झाले आहे. नया अंदुरा येथे जिजामाता विद्यालय असून या कॉलेजमध्ये हाता गावातील १०० च्या जवळपास विद्यार्थी उच्च शिक्षणाकरिता जाणे-येणे करतात.

## दिव्यांग सक्षमीकरणासाठी कला प्रदर्शनीचे आयोजन

**▪अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :** स्थानिक इंद्रप्रस्थ हॉटेल ,दुर्गा चौक येथे दि. २८ व २९ जून २०२५ रोजी उडान ग्रुप अकोला तर्फे भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे .सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत आयोजित या प्रदर्शनात दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोलाच्या दिव्यांग बांधवांनी तयार केलेल्या विविध कलात्मक वस्तूचे दालन रसीकांना अनुभवता येणार आहे. दिव्यांग बांधवांनी तयार केलेले पूजा साहित्य, बांबू वर्क ,कापडी पिशव्या, लोकर-क्रोशाचे विविध कलात्मक साहित्य व खाद्यपदार्थ या प्रदर्शनीत उपलब्ध राहणार आहे.या साहित्याची खरेदी करून दिव्यांग बांधवांच्या रोजगाराला सहकार्य करावे असे आव्हान दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोलाचे डॉ.विशाल कोरडे यांनी केले आहे. सदर प्रदर्शन महिला सक्षमीकरणासाठी असून महिलांना उद्योग व नवीन मंच मिळावा या उद्देशाने आयोजन केले असल्याची माहिती



समितीच्या भावना कारीया ,कीर्ती आडतिया व पूजा पोपट (श्री लोहाणा गुजराती समाज) यांनी दिली आहे. प्रदर्शनी मध्ये सहभाग नोंदवण्यासाठी दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोलाच्या ९४२३६५००९० या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा, अशी माहिती आमच्या प्रतिनिधीशी बोलताना आयोजकांनी दिली आहे.

### अल्पवयीन पिडितेसंबंधीत गुन्ह्यातील फरार आरोपी गजाआड

**▪तेल्हारा,दि २७ (प्रतिनिधी) :** तेल्हारा तालुक्यातील पिंपरखेड येथील रहिवासी आरोपी नामे करण श्रीकृष्ण जांबेरे वय २२ वर्षे यास अल्पवयीन पीडीते संबंधित गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यात तेल्हारा पोलिसांनी बुधवार दि. २५ जून २०२५ रोजी रात्री सव्वाआठ वाजता अटक केली आहे.

नमूद आरोपी विरुद्ध अपराध ११/२०२५ कलम १३७ क्र. (२), ६४ (२), (आय), ६४ (२) (एम) भारतीय न्याय संहिता (बी एन एस), सहकलम ४, ८, १२ पोस्को एक प्रमाणे गुन्हा दाखल होता. गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपी फरार होता. सदर प्रकरणी तेल्हारा पोलीस तपास करत असून आरोपीला गुरुवार दि. २६ जून २०२५ रोजी तेल्हारा न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याचे सूत्राने सांगितले.

## भरदिवसा घरफोडी मुद्देमालासहित दोन आरोपीना अटक

**▪अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :** सदर गुन्हयाची थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की, दिनांक २/१/२०२५ रोजी फिर्यादी नामे श्रीमती रेखा विजय घोडे, वय ३७ वर्षे रा. व्यवसाय खाजगी नोकरी रा. चक्रधर आक्रेड अपार्टमेंट बसेरा कॉलनी, अकोला. . यांनी पो स्टे खदान येथे रिपोर्ट दिला की, फिर्यादी त्यांचे राहते घराला कुलुप लावुन घराचे बाहेर नोकरी करीता गेल्या असता अज्ञात इसमांनी त्यांचे घराचे दरवाज्याचे कुलुप कोंडा तोडुन आत प्रवेश करून घरातील कपाटात ठेवलेले १) नगदी १,००,०००/ रु २) सोन्याचा गोफ १० ग्रॅम कि. ४५,०००/रु असा एकुण १,४५,००० / रू. चा मुद्देमाल चोरून नेला आहे. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून पो स्टे खदान येथे अपराध क्रमांक ५/२०२५ कलम ३३१(३),३०५ (अ) भा न्या सं गुन्हा दाखल करून तपासात घेतला.

सदर गुन्हा उघडकीस आणने कामी मा. पोलीस अधिक्षक सा. यानी आदेशीत केल्याने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा अकोला यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा वाशीम यांनी आरोपी १) आकाश प्रकाश पवार, वय ३५ वर्ष रा. बाराई ता मेहकर जि. बुलढाणा ह. मु. फत्तेपुर ता. खामगांव, जि. बुलढाणा, २) उमेश गटरंग पवार, वय २८ वर्ष रा. टाकरखेड हेलगा ता चिखली जि. बुलढाणा ह.मु. फत्तेपुर ता. खामगांव, जि. बुलढाणा




यांना त्याचे कडील गुन्हयात अटक केले त्या नंतर नमुद आरोपीतांना अकोला येथील घरफोडी चे गुन्हयात ताब्यात घेवुन तपास केला असता त्यांचे कडुन पो.स्टे. खदान, जुनेशहर, तेल्हारा येथील दिवसा घरफोडीचे गुन्हे केल्याचे कबुल केल्याने सदर गुन्हयात चोरी गेलेल्या मुद्देमाला पैकी १५ ग्रॅम सोने की अं. १,३५,०००/- रू तसेच २० ग्रॅम चांदी की. अं २००० असा एकुण १,३७,०००/- मुद्देमाल जप्त करण्यात आला.सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. अर्चित चांडक सा, मा. अपर पोलीस अधिक्षक, श्री . अभय डोंगरे सा. यांचे मार्गदर्शना खाली पो. नि. शंकर शेळके, स्थानिक गुन्हे शाखा, अकोला. सहा. पोलीस निरीक्षक विजय चव्हाण, पोउपनि, गोपाल जाधव, पोहवा वसीमोद्दीन, अब्दुल माजीद, खुशाल नेमाडे, एजाज अहमद, किशोर सोनोने यांनी केले.

## महावितरणच्या जिगरबाज कर्मचाऱ्यांनी भर पावसात केली दुरूस्ती

### जलमग्न झालेल्या झरंडी गावातील वीज खांब आणि डिपी वाहून गेली

**▪अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :** वीज आणि पाण्याचा छत्तीसचा आकडा असला तरी अत्यंत धोक्याच्या परिस्थितीत अत्यंत सुरक्षीतपणे महावितरणच्या पिंजर येथील कर्मचाऱ्यांनी भर पावसात पिंजर गावठाण वाहिनीची दुरूस्ती केली आणि वीज पुरवठा सुरू केला केला.महावितरणच्या या जीगरबाज कर्मचाऱ्यांच्या धाडसाचे आणि कार्यतत्परतेचे गावकरी व माध्यम प्रतिनिंधींकडून कौतूक करण्यात येत आहे. काल पिंजर परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे पिंजर गावठान वाहिनी नादूरूस्त होऊन वीज पुरवठा खंडित झाल्यामुळे पिंजर गावातील दोन हजार ग्राहक अंधारात गेली होती.परंतू महावितरणचे कर्मचारी वैभव करपे, धीरज कुमार राऊत ,श्री आठवले यांनी जोखीम पत्कारत चालू पावसात आणि अत्यंत सुरक्षीतपणे दुरूस्ती कार्याला सुरूवात केली आणि अथक प्रयत्नानंतर वीज पुरवठा सुरळीत करण्यात त्यांना यश



आले.

**जलमग्न झालेल्या झरंडी गावातील डिपी गेली वाहून**

पातूर तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे विश्वमित्रा नदीचे पाणी झरंडी या गावात घुसल्याने संपूर्ण गाव जलमग्न झाले असून गावाचा संपर्क तुटला आहे. किमान बारा तासाच्या अवधीनंतर पुराचे प्रमाण कमी झाल्यानंतर गावाशी संपर्क साधता येणार आहे. पुराच्या प्रचंड दाबामुळे गावाला वीज पुरवठा करण्यासाठी असलेली डिपी पाण्याच्या प्रवाहात वाहून गेली आहे. तसेच शेजारील शेतातील वीज खांबही पडल्याने झरंडी गावाचा संपूर्ण वीज पुरवठा खंडित झाला आहे.

झरंडी गावासहीत परिसर जलमग्न झाल्यामुळे वीज खांब आणि डीपी वाहून नेण्यासाठी संभाव्य परिस्थिती निर्माण होताच महावितरणकडून तातडीने वीज पुरवठा दुरूस्तीच्या कार्याला गती देण्यात येणार असल्याची माहिती कार्यकारी अभियंता गोरक्षनाथ सपकाळे यांनी दिली आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमिवर महावितरण सज्ज असून मुख्य अभियंता राजेश नाईक आणि अधीक्षक अभियंता प्रतिक्षा शंभरकर महावितरणच्या संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे.

### अकोला मार्गे आषाढी विशेष एकेरी रेल्वे धावणार

अकोला : पंढरपूर आषाढी यात्रे निमीत्त मध्य रेल्वे ३ एकेरी आषाढी विशेष गाड्या चालवणार आहे. पंढरपूर येथे होणाऱ्या आषाढी एकादशीला सहभागी होणाऱ्या यात्रेकरूंच्या सोयीसाठी, मध्य रेल्वे १ ते १० जुलै या कालावधीत पुणे ते मिरज, मिरज ते नागपूर आणि मिरज लातूर अशा तीन एकेरी आषाढी विशेष गाड्या चालवणार आहे. मध्य रेल्वे सध्या ८३ आषाढी विशेष गाड्या चालवत आहे.आषाढी यात्रे निमीत्त भाविकांची गर्दी पाहता मध्य रेल्वेने आता ३ एकेरी रेल्वे, सोडण्याचा निर्णय घेतला आहे. एकेरी गाड्यांमध्ये पुणे-मिरज ) एकेरी विशेष गाडी ८ जुलै रोजी पुणे येथून सकाळी ७ वाजता सुटेल आणि मिरज येथे त्याच दिवशी दुपारी १२.३० वाजता पोहोचेल. या गाडीला लोणंद, सातारा, कराड, किर्लोस्करवाडी आणि सांगली येथे थांबा आहे. मिरज - नागपूर एकेरी विशेष गाडी ८ जुलै रोजी मिरज येथून १२.५५ वाजता सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी ९ जुलै रोजी १२.२५ वाजता पोहोचेल.

### श्री भाऊसाहेब पोटे विद्यालयात राजश्री शाहू महाराज जयंती व जागतिक अमली पदार्थ विरोधी दिन साजरा



**▪अकोट,दि २७ (प्रतिनिधी) :** स्थानिक भाऊसाहेब पोटे विद्यालय अकोट येथे दिनांक २६ जून २०२५ रोजी रायतेचा राजा, आरक्षणाचे जनक छत्रपती शाहू महाराज जयंती उत्सव व पोलीस अधीक्षक आर्चितजी चांडक (खझड)यांच्या संकल्पनेतून अकोला पोलीस दल यांचे संयुक्त विद्यमाने उडान मिशन या मोहिमेअंतर्गत अमली पदार्थ मृत्यूचा मार्ग या विषयावर चित्रकला स्पर्धाचे आयोजन करण्यात आले.याप्रसंगी सर्वप्रथम छत्रपती शाहू महाराजांच्या पुतळ्याचे पूजन व हार अर्पण करण्यात आले . त्यानंतर मंचावर उपस्थित कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.श्री शिरीष पोटे (अध्यक्ष छत्रपती शाहू शिक्षण संस्था अकोट )प्रमुख अतिथी प्रा. डॉ. सौ मेघनाताई पोटे (सचिव छत्रपती शाहू शिक्षण संस्था अकोट )विद्यालया व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य मा.श्री पी. बी. रावणकार पर्यवेक्षक श्री पी.एम. गावंडे, प्रा. विवेक पोटे, अजय घनबहादूर प्रा. एन. एम. भावे, संचालक अमोल तळोकार, शाहू महाराजांची भूमिका साकारणारा ८ अ चा विद्यार्थी आदित्य थोटे ही मान्यवर होते.

# गुन्हे शाखेची गोवंश तस्करांवर कारवाई

**२ मालवाहू पिकअप वाहने व १ मोटर सायकल सह एकुण २३,७५,००० रूपयांचा मुद्देमाल जप्त**

## २३ गोवंशाना दिले जिवनदान



■अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :
अकोला जिल्हात मोठया प्रमाणात गोवंश जातीचे जनावरे वाहतुक करून कत्तली करीता घेवुन जाण्याचे प्रमाणे वाढत असल्याने मा. पोलीस अधिक्षक श्री. अर्चित चांडक साहेब यांनी आदेशित करून त्यास प्रतिबंध करणे बाबत सुचना दिल्याने स्थानिक गुन्हे शाखा, अकोला चे प्रमुख श्री. शंकर शेळके यांनी स्वतः भल्या पहाटे दोन पथकासह सापळा रचुन नागपुर वरून समृध्दी महामार्ग वरून अकोला कडे येणारे ०२ पीकअप वाहने वेगवेगळ्या वेळेत महान मार्गे शहरात येत असतांना जुने शहर हद्दीत नाकाबंदी करून पकडण्यात आले. यामध्ये पीकअप वाहन क्र. १ ) एम. एच. ३० बी. डी. ५६८६२) एम. एच. ३१ एफ. सी. २४८९ ज्यामध्ये गाय, गो-हे, कालवड असे एकुण २३ गोवंश जातीचे जनावरे निर्दयतेने कोंबुन कत्तली साठी वाहतुक करतांना मिळुन आल्याने त्यांची सुटका करून उपचार, देखरेख व संगोपणाकरिता आदर्श गौसेवा संस्था म्हैसपुर येथे दाखल करण्यात आले.

गोवंश भरून नागपुर वरून आलेल्या पिकअप वाहनाना स्थानीक पोलीसांवर लक्ष ठेवुन वाहनाना मार्ग दाखविन्या करिता असलेला इसम यास त्याचे मोटर सायकल सह ताब्यात घेतले. इसम नामे १) सकलेन मुस्ताक मोहम्मद आरीफ कुरेशी वय २५ वर्ष, मच्छी मार्केट ताजनापेठ अकोला २) लोकनाथ मुन्नास्वामी पिल्ले वय २५ वर्ष, रा. कोळसा टाल, धोबी चौक, कामठी जि. नागपुर, व फरार आरोपी नामे ३) गुल मोहम्मद शेख बाबु रा. वाशिम बायपास, अकोला ४) मोहम्मद अल्तमश मोहम्मद हबीब ( कुरेशी) रा. मच्छी मार्केट, ताजनापेठ, अकोला यांचे विरुध्द पोलीस स्टेशन जुने शहर अकोला येथे गुन्हा दाखल करण्यात येत आहे.

सदर गुन्हयातील जप्त २३ गोवंश जातीचे जनावरे एकुण कि. ५,७५,०००/- रू तसेच गुन्हयात वापरण्यात आलेले वाहन पीकअप वाहन क्र. १ ) एम. एच. ३० बी.डी. ५६८६ कि. अं. ८,५०,०००/रू, २) पीकअप वाहन क्र. एम. एच. ३१ एफ. सी. २४८९ कि.अं. ८,५०,०००/रू व मोटर सायकल क्र. कझ डकखछए कंपणीची दुचाकी क्र. चक-३०-इझ ८०७२ कि. अं. १०००००/ रु असा एकुण २३,७५,०००/ रूपयांचा मुद्देमला जप्त करण्यात आला.

# झपाट्याने आलेल्या पुरामुळे घरांचे व शेतीचे मोठे नुकसान

❊सावरगाव गावातील शेतकऱ्यांची मदतीची मागणी ❊सोलर पंप व पॅनेल वाहून गेले
❊नदीकाठच्या शेतजमिनी जलमय ❊सरपंच बसंतीबाई राठी यांची शासनाकडे मागणी





■पातुर,दि २७ (प्रतिनिधी) :
पातूर तालुक्यातील शिर्ला गावात झालेल्या अवकाळी पावसामुळे गावातील धरण पूर्ण भरले असून, नद्या तुडुंब भरून वाहत आहेत. त्यामुळे नदीकाठच्या शेतजमिनींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पुरपरिस्थिती मुळे अनेक शेतकऱ्यांच्या घरात व शेतात पाणी शिरल्याने घरगुती व शेतीची आर्थिक हानी मोठ्या प्रमाणावर झाली आहे.या घटनेत सुरेश चौधरी व पंडित इंगळे यांचे घरांचे नुकसान झाले असून, पावसाचे पाणी त्यांच्या घरात घुसल्याने घरातील साहित्याचेही नुकसान झाले आहे.

शेतमालाचे व शेतीसाठीच्या उपकरणांचे मोठे नुकसान झाल्याचेही समोर आले आहे:

कैलास किसन चूनडे यांच्या शेतातील सौर पंप संपूर्णपणे वाहून गेला. सुरेश किसन चूनडे यांचे सोलर पॅनल देखील पावसाच्या पाण्यातून वाहून गेले. गावातील नदीकाठच्या परिसरातील अनेक शेतजमिनी जलमय झाल्या असून, उभ्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायत सरपंच सौ. बसंतीबाई राधेश्यामजी राठी यांनी तात्काळ परिस्थितीचा आढावा घेतला असून, शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने या शेतकऱ्यांना त्वरीत आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी केली आहे.

'सावरगाव गावातील अनेक शेतकरी आणि कुटुंबीय संकटात सापडले आहेत. पावसामुळे घरांचे, शेतांचे, सौर उपकरणांचे मोठे नुकसान झाले आहे. शासनाने या घटनेकडे गांभीर्याने पाहून तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी.'

**शेतकऱ्यांची मागणी:**

१. गावात तात्काळ नुकसान पंचनामे करून मदत वाटप सुरू करावी.२. सोलर पंप व पॅनलसाठी विशेष अनुदान योजना राबवण्यात यावी.३. गावातील धरण व नदीकाठच्या भागासाठी आपत्ती व्यवस्थापन योजना तयार करण्यात यावी.सावरगाव गावातील शेतकरी सध्या संकटात असून, त्यांना तातडीने शासनाची मदतीची गरज



आहे. स्थानिक प्रशासनाने त्वरित घटनास्थळी भेट देऊन पंचनामे करावेत व मदतीचे वाटप लवकरात लवकर सुरू करावे, अशी एकमुखी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# चतारी येथील शेतकरी नुकसान भरपाईपासून वंचित : पंचनाम्यात अपारदर्शकतेचा आरोप

■पातुर,दि २७ (प्रतिनिधी) :
पातूर तालुक्यातील मोजे चतारी येथील तब्बल शेतकरी झालेल्या निसर्ग आपत्तीच्या नुकसान भरपाईपासून वंचित राहिले आहेत. यासाठी जबाबदार व्यक्ती म्हणून ग्रामस्थांनी चतारी येथील कृषी सहाय्यक वंदना ताकझुरे यांच्यावर गंभीर आरोप लावले आहेत. त्यांनी खाजगी व्यक्तीमार्फत पंचनामे करून अधिकृत प्रक्रिया झुगारून दिल्यामुळे, वास्तविक नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे नावे यादीतून वगळण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.या संदर्भात शेतकऱ्यांनी तहसील कार्यालय पातूर येथे तहसीलदार डॉ. राहुल वानखडे यांना निवेदन सादर



करून आपली व्यथा मांडली. निवेदनात नमूद करण्यात आले की, ११ मे २०२५ रोजी कृषी सहाय्यक स्वतः शेतात येऊन उभ्या पिकाचे फोटो काढून पंचनामे केल्याचा दावा केला गेला. मात्र, आजपर्यंतही संबंधित शेतकऱ्यांची नावे लाभार्थी यादीत समाविष्ट करण्यात आलेली नाहीत.सौ. अनिता विजय आखरे (मा.जिल्हा परिषद सदस्य), विकास किर्तने (सामाजिक कार्यकर्ते), योगेश बहुरूपी, दिनेश इंगळे, आकाश बोराडे, कैलास डोंगरे, रामचंद्र वाळोकर, सुभाष साबळे, विनोद खंडारे, संतोष महल्ले, स्वप्नील आखरे, भिकाजी काकड,ज्ञानेश्वर ढोरे,अभिषेक भालतीलक व योगेश पाचपोर इतर अनेक शेतकरी.'शेतकऱ्यावरील अन्याय खपवून घेतला जाणार नाही' - विकास किर्तनेसामाजिक कार्यकर्ते विकास किर्तने यांनी या संपूर्ण प्रकरणावर तीव्र नाराजी व्यक्त करत स्पष्ट शब्दांत म्हटले की, 'पातूर तालुक्यातील चतारी येथील शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपासून वंचित ठेवण्यात आले आहे.

# स्मशानभूमीअभावी मृताला ७ किमी दूर अंत्यसंस्कार! प्रशासनाचा ग्रामीण भागांकडे दुजाभाव?

■मुर्तिजापुर,दि २७ (प्रतिनिधी) :
तालुक्यातील गट ग्रामपंचायत समशेरपूर अंतर्गत येणाऱ्या जीतापूर नाकट (लोकसंख्या सुमारे ५००-६००) या गावात काल, २५ जून रोजी दशरथ बळीराम तायडे (वय ८०) यांचे निधन झाले. मात्र या गावात स्मशानभूमीचाच पूर्ण अभाव असल्याने मृतदेहावर गावात अंत्यसंस्कार करता आले नाहीत. गावाच्या दोन्ही बाजूंनी नाले वाहतात, त्यामुळे पावसाळ्यात गाव पूर्णतः वेढ्यात येते. परिणामी, ग्रामस्थांना मृतदेह ७ किलोमीटर लांब मूर्तिजापूर येथील मोक्षधाम स्मशानभूमीत नेऊन अंत्यसंस्कार करावा लागला.ही घटना केवळ एका कुटुंबाची वेदना नाही, तर संपूर्ण गावासाठी मन हेलावून



टाकणारा सामाजिक अन्याय आहे. शहरांमध्ये कोट्यवधींचा निधी वापरून आधुनिक स्मशानभूमी उभारल्या जातात, पण ग्रामीण भागातील मूलभूत गरजा मात्र वारंवार दुर्लक्षित केल्या जात आहेत.

## दिव्यांग सोशल फाउंडेशन तर्फे डॉ.हेलन केलर जयंती संपन्न

■अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :
स्थानिक दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला व शिवाजी महाविद्यालय अकोला च्या संयुक्त विद्यमाने डॉ.विशाल कोरडे यांच्या मार्गदर्शनात २७ जून २०२५ रोजी डॉ. हेलन केलर जयंती साजरी करण्यात आली.❊ डॉ. हेलन केलर ह्या जगातील पहिल्या दिव्यांग पदवीधर होत्या.त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य दिव्यांग सेवेसाठी



समर्पित केले होते. डॉ.हेलन केलर यांचा आदर्श ठेवून दिव्यांग सोशल फाउंडेशन तर्फे दिव्यांगाना पांढरी काठी,ब्रेल बुक्स व शिष्यवृत्ती देऊन सहकार्य करण्यात येत आहे.ह्या जयंती निमित्त अंध बांधवांना डिजीटल सेन्सर युक्त पांढरी काठीचा उपयोग करण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे. दिव्यांगांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी संस्थे तर्फे विविध शोभिवंत वस्तू व पूजा साहित्य निर्मिती कार्यशाळा घेण्यात आली.ज्या दिव्यांग बांधवांना ह्या सामाजिक उपक्रम‌ात सहभाग नोंदवायचा आहे त्यांनी ९४२३६५००९० या संस्थेच्या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन अनामिका देशपांडे यांनी केले आहे. डॉ.हेलन केलर जयंती उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी अस्मिता मिश्रा, विजय कोरडे, पूजा गुंटीवार, गायत्री डहाके, डॉ.अरुणा सिंगी, डॉ.संजय तिडके, केशवराव डाहाके, सरोज तिडके व तन्वी दळले यांनी सहकार्य केले.

## छत्रपती शाहू सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने शाहू महाराज जयंती साजरी



■अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :
छत्रपती शाहू सार्वजनिक वाचनालय, हनुमान नगर, अकोला च्या वतीने दिनांक २६ जून २०२५ रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. वाचनालयाचे सचिव श्री राम मुळे यांचे हस्ते छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला व दीप प्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी राम मुळे यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याची माहिती विशद केली व वाचनालया मध्ये छत्रपती शाहू महाराजांचे स्मृती ग्रंथ व त्यांच्यावरील लिखित अनेक नामांकित लेखकांचे ग्रंथ वाचकांसाठी आज रोजी ठेवण्यात आले. या वाचन संधीचा परिसरातील नागरिकांनी फायदा घ्यावा असे याप्रसंगी राम मुळे यांनी केले.

## जगन्नाथ मंदिरात जगन्नाथ रथयात्रा उत्सव संपन्न

■अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :
स्थानीय कृषि विद्यापीठ परिसरातील १५० वर्ष पुरातन भगवान जगन्नाथ मंदिरात जगन्नाथ रथयात्रा उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. श्री जगदीश मंदिर सेवा समिति ट्रस्ट,पिकेव्ही परिसर द्वारा आयोजित या मंदिरात प्रतिवर्ष आषाढी दूजवर भगवान जगन्नाथ रथयात्रा पर्व उत्सव आयोजित करण्यात येत असते.या पावन दिनी मंदिरात भगवान जगन्नाथ,भगवान बलभद्र व सुभद्रा यांचे पूजन, अभिषेक व आरती केली जाते.या उत्सवात संपन्न झालेल्या महाआरती सोहळ्यात आ वसंत खंडेलवाल, शक्तीधाम सेवा समितीचे सुनील पसारी,राजू शर्मा बालाजी, सर्वेश अग्रवाल,कीर्तेश अग्रवाल,भूषण व मित्र परिवार, मंदिराचे मुख्य पुरोहित सतीश दुबे, आशीष दुबे, जितेश दुबे, राधेश्याम शर्मा, भजन गायक राधेश्याम शर्मा, ओम नारियलवाले, दिनेश शर्मा शनि मंदिर, शिवकुमार



परिहार, डॉ दिलीप अग्रवाल दर्शन राठी,सुरेश यादव,पदमा अग्रवाल, हुकुमचंद गुप्ता, किशोर खंडेलवाल, गिरीश जोशी आदी उपस्थित होते.या उत्सवात राधा कृपा मंडळचे राधेश्यामजी शर्मा यांनी व सालासर मंडळ द्वारा भजन कार्यक्रम संपन्न झाला.या सोहळ्यात मंदिरात जाणायेण्याची दुरवस्था बघता येथे रस्ता निर्मितीची भावना आ खंडेलवाल यांनी व्यक्त केली.महाप्रसादने या उत्सवाचे समापन करण्यात आले. प्रसाद यजमान म्हणून दर्शन राठी, हुकुमचंद गुप्ता परिवार,प्रसादी संजय शर्मा कॅटरर्स यांनी योगदान दिले. यावेळी शेकडो भक्त उपस्थित होते.

# रविवारी माळी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा होणार कौतुक सोहळा

**ग्रामविकास राज्यमंत्री जयकुमार गोरे यांची राहणार उपस्थिति**

अकोला :अ भा माळी महासंघ जिल्ह्याच्या वतीने रविवार दिनांक २९ जून रोजी स १० वाजता स्थानीय प्रमिलाताई ओक हाल येथे २० व्या गुणवंत विद्यार्थी व पालक सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये उद्घाटक म्हणून राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज्यमंत्री ना जयकुमार गोरे यांची उपस्थिती राहणार असल्याची माहिती महासंघाच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली. या पत्रकार परिषदेत माजी आ. बळीराम सिरस्कार, माळी महासंघाचे राष्ट्रीय सरचिटणीस सुभाष सातव, जयवंतराव मसने, जिल्हा अध्यक्ष एड प्रकाश दाते उपस्थित होते. गत २० वर्षापासून महासंघाच्या वतीने समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या कौतुक सोहळ्याच्या आयोजन सातत्याने केले जात आहे. विद्यार्थ्यांच्या



सुप्त गुणांना उजाळा देण्यासाठी यावर्षी दहावी मधील ८५ टक्केच्या वरील १४८ विद्यार्थी व बारावी मधील ७५ टक्के च्या वरील ५७ विद्यार्थी तसेच सीईटी जेईई,नीट परीक्षेतील गुणवत्ता प्राप्त ३४ विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या सोहळ्याची जय्यत तयारी अ. भा. माळी महासंघ शाखा अकोलाच्या वतीने होत असून ज्येष्ठ सेवाभावी शंकरराव गिर्हे यांच्या अध्यक्षतेत आयोजित या सोहळ्यात श्रीमती वनिता राऊत, माजी राज्यमंत्री सुधाकरराव गणगणे, माजी आ लक्ष्मणराव तायडे, माजी आ बळीराम शिरस्कार, जि प अध्यक्ष संगीताताई आढाव, महापौर अर्चनाताई मसने, उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती बाळासाहेब उर्फ संजय मेहरे, भाजप महानगर अध्यक्ष जयंतराव मसने, काँग्रेसचे प्रदेश सचिव प्रकाश तायडे उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), अकोला यांचे न्यायालयात**

एम.जे.सी. नं १००८/२०२५ प्रोसेस नं. ९३२१/२०२५
चौ. ता.: ०२/०८/२०२५ दिनांक: २०/०६/२०२५

**अर्जदार:**-१. कैलास बळीरामजी ढोरे २. सौ. पुष्पा कैलास ढोरे दोघेही रा. कानशिवनी, ता. जि. अकोला....**विरुद्ध...गैरअर्जदार :- निल मयताचा पत्ता:- मयत:- सुमित कैलास ढोरे पत्ता:-** रा. कानशिवणी,ता. जि. अकोला. या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, **मयत- सुमित कैलास ढोरे** यांचे **दि. १०/०२/२०२५ रोजी** दत्तवाडी शिवार येळवण ते विझोरा रोड, ता. बार्शिटाकळी जि. अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार व त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास **दिनांक ०२/०८/२०२५ रोजी** सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी.**आज दिनांक २०/०६/२०२५ रोजी** माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
**प्र. (अधिक्षक)**
**दिवाणी न्यायालय ( व.स्तर),अकोला**

### जाहीर नोटीस

**०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), अकोला यांचे न्यायालयान**

एम.जे.सी. नं १००७/२०२५ प्रोसेस नं. ९३३०/२०२५
चौ. ता.: ०४/०८/२०२५ दिनांक: २०/०६/२०२५

**अर्जदार:**-१. विद्या विकास गळकरी रा.पवनप्रसाद अपार्टमेंट, प्रसाद कॉलनी, उमरी, अकोला, ता.जि.अकोला.२.श्रद्धा वैभव फुलाडी रा.घर क्र. १३२. टिळक पार्क जवळ, दामले मार्ग. रामदासपेठ, अकोला ता. जि. अकोला ...**विरुद्ध...गैरअर्जदार :-** निल, **मयताचा पत्ता: मयत: विकास बापुसा गूळकरी पत्ता :- रा. पवनप्रसाद अपार्टमेंट, प्रसाद कॉलनी, उमरी, अकोला ता. जि. अकोला** या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की. **मयत- विकास बापुसा गुळकरी यांचे दि ३०/०३/२०२५ रोजी** अकोला येथे निधन झालं आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसरल्याही प्रकारची हरकत असल्यास **दिनांक ०४/०८/२०२५ रोजी** सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज **दिनांक** २०/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले

शिक्का

**आदेशानुसार**
**प्र. (अधिक्षक)**
**दिवाणी न्यायालय ( व.स्तर),अकोला**

# रोटरी क्लब नॉर्थतर्फे शैक्षणिक साहित्य वाटप उत्साहात

**राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त आयोजन**



■अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :
रोटरी डिस्ट्रीक्ट गर्व्हनर रजिंदरसिंग खुराणा, सहाय्यक प्रांतपाल राजीव बजाज यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यक्ष प्रा. प्रवीण ढोणे यांच्या नेतृत्वात रोटरी क्लब ऑफ अकोला नॉर्थ व अंकुर सिड्स प्रा. लि. यांच्यातर्फे राजर्षी शाहू महाराज जयंजीनिमित्त देशभक्त तंत्र, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तांदळी खुर्द येथे प्रभारी प्राचार्य ज्ञानेश्वर साबळे यांच्या अध्यक्षतेखाली शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आलेयावेळी देशभक्त विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य ज्ञानेश्वर साबळे, रोटरी क्लब ऑफ अकोला नॉर्थचे अध्यक्ष प्रा. प्रवीण ढोणे, अंकुर सिड्सचे विभागीय व्यवस्थापक सिध्देश्वर भूसारी, शिक्षक विश्वभर माळी, संतोष ढेंगे, बाबूराव गावंडे, लता खानंदे आदींच्या हस्ते नवीन प्रवेशीत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करुन त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी प्रास्ताविक प्रा. प्रवीण ढोणे तर मार्गदर्शन सिध्देश्वर भूसारी, अध्यक्षीय भाषण ज्ञानेश्वर साबळे यांनी केले आभारप्रदर्शन विश्वभर माळी यांनी केले यावेळी राजेश गावंडे, सेवानंद खंडारे, संजय पुंडकर आदींसह कर्मचाऱ्यांसह विद्यार्थी उपस्थित होते असे सचिव डॉ. मेघना गांधी व नंदकिशोर पाथ्रीकर यांनी कळिवले आहे.

## न्यूईरा कॉन्हेंटमध्ये छत्रपती शाहू महाराज जयंती

**अकोला :** येथील न्यू ईरा कॉन्व्हेंट येथे गुरुवार, २६ जून रोजी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्ष शाळेच्या मुख्याध्यापिका अंजली देशमुख यांनी शाहू महाराजांच्या प्रतिमेला हार अर्पण और चिटी सफल बनना करून पूजन केले. मुलांनी शाहू महाराजांच्या जीवन कार्यावर भाषणे दिली. तसेच न्यू ईरा कॉन्व्हेंटच्या मुख्याध्यापिका अंजली यांनीसुद्धा मुलांना मार्गदर्शन करून शाहू महाराजांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शारदा होणाळे यांनी केले.

**(टी.सी.) हरवली**

**अनुप अशोक तायडे रा. तुलंगा बू. ता.पातूर याची वर्ग १२ वा. सायन्स फॅकल्टी शाळा सोडण्याचा दाखला (टी सी) हरवली आहे. कोणाला मिळाल्यास संपर्क करा .**
**मो.९०११५३२१३०**

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण ननसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक श्रीकृष्ण ननसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९१२२९७००२३+स्थानिक संपादक पुरुषोत्तम ढोले फोन ९८८१४८१४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

